# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई - ४००००८

दूरध्वनी - २३०७५५३९/२३०२ ३९०० e-mail : pro@msrtc.gov.in फॅक्स - २३०८६३५२


==================================================

**<u>प्रसिध्दी पत्रक - २७</u>**

## लाच स्विकारणारा एस टी कर्मचारी निलंबित

**<u>मुंबई, सोमवार, दि. १७ मे, २०१०</u>**

रा.प. महामंडळाच्या रायगड विभागाच्या रामवाडी-पेण बस स्थानकावरील फिरता विक्रेता परवानाधारक श्री. शहाजी थोरात यांचेकडून त्यांच्या परवाना नुतनीकरणासाठी रु. १५,०००/-ची लाच स्विकारतांना एस.टी.चे सहाय्यक वाहतूक निरिक्षक (वाणिज्य), श्री. विजय मोरे यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शुक्रवार, १४ मे रोजी सापळा रचून रंगेहाथ पकडले होते.

वरील घटनेची माहिती मिळाल्यावर रा.प.महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दीपक कपूर यांनी रा.प. रायगड विभागाचे विभाग नियंत्रक श्री. जगदीश कदम यांना संबंधितावर त्वरीत कारवाई करुन अहवाल पाठविण्याचे आदेश दिले होते.

श्री. कपूर यांनी सदर घटनेची गंभीर दखल घेतली असून श्री. विजय मोरे यांना सेवेतून तात्काळ निलंबित करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. त्याचप्रमाणे संबंधितावर त्वरीत कारवाई न करणाऱ्या व अहवाल पाठविण्यास दिरंगाई करणाऱ्या श्री. जगदीश कदम, विभाग नियंत्रक, रा.प.रायगड विभाग यांचेकडून त्यांची विभागीय चौकशी कां करण्यात येऊ नये? याबाबत खुलासा मागविण्यात आला आहे.

रा.प.महामंडळात अशा प्रकारच्या गैरवर्तनाची अत्यंत गंभीर दखल घेऊन दोषींवर कडक कारवाई करण्यात येईल व घटनेचे गांभिर्य लक्षात घेऊन त्वरीत कार्यवाही न करणाऱ्या उच्च अधिकाऱ्यांवरसुध्दा कडक कारवाई केली जाईल असे श्री. दीपक कपूर यांनी स्पष्ट केले आहे.

**सहा.जनसंपर्क अधिकारी**